## ऋणनिर्देश

------

प्रस्तुत शोधप्रबंध शिवाजी विद्यापीठाला सादर करताना समाधान वाटत आहे. प्रस्तुत शोधप्रबंधाचे काम पूर्ण करीत असतांना अनेक कौटुंबिक व इतर अडचणी निर्माण झाल्या. परंतु माझे मार्गदर्शक डॉ. रा.भा.देवस्थळी, प्रपाठक, शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी वेळी-अवेळी अगत्यपूर्वक मार्गदर्शन केले. त्यांनी मला सतत कर्तव्य बुद्धीची जाणीव करुन देऊन प्रेरणा दिली व माझेकडून सर्व काम पूर्ण करवून घेतले. त्यामुळेच हा शोधप्रबंध मी पूर्ण करु शकलो. त्यांचे आभार मानलेले त्यांना आवडणार नाही म्हणून सदैव त्यांच्या ऋणात राहणेच श्रेयस्कर आहे.

श्रीमंत विजयसिंहराव डफळे, राजेसाहेब जत यांचे प्रोत्साहन, मार्गदर्शन व प्रेरणा सतत मिळाल्याने प्रस्तुत शोधप्रबंधाचे काम पूर्ण झाले. त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या संदर्भात डॉ. पी.आर्.नळदकर, डॉ. आ.ह.साळुंखे व माझ्या भगिनी डॉ. एस्.एस्.राजेभोसले यांनी वेळोवेळी मौलिक सूचना करुन सहकार्य केले याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. आमच्या महाविद्यालयाची प्रेरणामूर्ती प्राचार्य डी.डी.देसाई यांचे तर नेहमीच प्रोत्साहन व सहकार्य मिळत होते. त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. याशिवाय कॉलेज ऑफ एज्युकेशन, कराड येथील प्रभारी प्राचार्य व्ही.एम्.कोळी व माझा सहकारी प्राध्यापकवृंद प्रा. डॉ.एच्.के.गुरव, प्रा. एम्.पी.सुरवसे, प्रा.बी.डी. पाटील, प्रा. सौ. पी.डी. देसाई यांनीही वेळोवळी आवश्यक ते सहकार्य करुन शोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी मला सतत प्रोत्साहन दिले आहे त्यांचाही मी आभारी आहे.

आमच्या महाविद्यालयाचे ग्रंथपाल एन्.एस्.पाटील, कराड नगरवाचनालयाचे ग्रंथपाल श्री. विठ्ठल पाटील, शि.म.बापूजी साळुंखे महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. कमळकर यांनी वेळोवेळी सहकार्य देऊन आवश्यक त्या संदर्भ पुस्तकांचा पुरवठा केला याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार।

कराड शहरातील विविध महाविद्यालयातील प्राचार्यांनी आपआपल्या महाविद्यालयातील

इयत्ता ।।वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांचे सहकार्य मिळवून देऊन निबंध लेखनाची आधारसामग्री मिळवून देण्याबाबतीत आपुलकीने मदत केली. त्याबद्दल प्राचार्य आर्.ए.कदम, प्रा.डिसूझा, प्राचार्य थोरात, प्राचार्य खोत व प्राचार्य जमदग्नी यांचा मी अत्यंत आभारी आहे.

या शोधप्रबंधाच्या टंकलेखनाचे काम सुबकपणे करुन देण्यासाठी क्वालिटी सायक्लोस्टायलिंग सातारा, च्या संचालिका सौ. शोभना खिरे यांचा सहभाग महत्वाचा आहे. त्यांचाही मी ऋणी आहे.

याशिवाय अनेक ज्ञात व अज्ञात व्यक्तींचे सहकार्य लाभले आहे. त्यांचा ऋणनिर्देश व्यक्त करीत आहे.

प्रस्तुत शोधप्रबंध मराठी भाषेतील शब्दसंपत्तीच्या अभ्यासकांना उपयुक्त ठरावा हीच इच्छा आहे.

स्थळ - कोल्हापूर

दिनांक - २९, नोव्हेंबर, 1989

VChavan

(श्री. वि.वि. चव्हाण)